# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/११/२०२४ (रविवार) दुपार**

---

## प्राणांतिक अपघात

पोस्टे केळवद अंतर्गत मौजा नरसाळा (खापा) बिहाडा फाटा येथे दि. १३/११/२०२४ चे २१.०० वा. ते २२.०० वा. दरम्यान फिर्यादीचा मृतक भाऊ नामे— मंगेश शेषराव वाडीककर, वय ३५ वर्ष, रा. तेलीपुरा सावनेर हा आपली मोटरसायकल क्र. एम एच ४०/१८०४ ने उमरी येथे कार्यक्रम पाहण्याकरिता जात असता समोरून येणारी अज्ञात मोटरसायकलचे चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीच्या भावाच्या मोटरसायकलला जोरदार धडक मारली. फिर्यादीचा भाऊ हा सदर अपघातात गंभीर जख्मी झाला. प्रथम उपचारकामी ग्रामिण रूग्णालय सावनेर तेथुन रेफर केल्याने मेओ हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी उपचारा दरम्यान मरण पावल्याचे सांगीतले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सागर श्रावणजी बाळबुधे वय २८ वर्ष रा वॉर्ड क्र. १४ चिचपुरा पाण्याची टाकीरोड सावनेर यांचे रीपोर्ट वरून पोस्टे केळवद येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम २८१, १२५ बी, १०६ बी एन एस सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध केळवद पोलीस घेत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर